१३

# आरोग्य सेवा संचालनालय

(महाराष्ट्र राज्य)

"आरोग्य भवन ", सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, मुंबई- ४०० ००१

| कार्यालय | दूरध्वनी | |
|---|---|---|
| संचालक (वैयक्तिक) | २२६२१०११-१६ | Website : http://maha-arogya.gov.in/ |
| सहसंचालक (रुग्णालये-राज्यस्तर) | २२६२१००६ | Email : dhs_2005@rediffmail.com |
| सहसंचालक (प्राआकेंद्र-जिपस्तर) | २२६११८७१ | Email : mhcell@rediffmail.com |
| सहसंचालक (असंसर्गजन्य रोग) | २२६२०९८१ | Fax No. 022-22621034 / 22620234 (DHS) |
| सहसंचालक (खरेदी कक्ष) | २२६२११८६ | 022- 22679044(Hosp.) |
| सहसंचालक (अर्थ व आस्थापना) | २२६२६९८९ | 022-22622155(CAO) |
| | २२६२६७५५ | 022-22703785(Control Room) |
| | | 022-22621047 (NCD) |
| | | 022-22625799(Procurement Cell) |
| | | पत्र क्र. संआसे/ खरेदी कक्ष/ औषधी व साधन सामुग्री खरेदी/ दर/ २०१२ दि. ११ /०२/ २०१३ |

प्रति

१) विभाग प्रमुख (सर्व)

२) उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळे (सर्व)

विषय :- औषध खरेदी करण्यासाठी दर ठरविण्या बाबत.

संदर्भ :- शासन सार्वजनिक आरोग्य विभाग पत्र क्र. खरेदी - २०१३/ प्र.क्र.१९/ आरोग्य - ८ दिनांक ११ फेब्रुवारी २०१३

उपरोक्त संदर्भिय शासन पत्राद्वारे शासनाने औषधे व साधन सामग्री खरेदी साठी अवलंबावयाच्या कार्यपध्द्ती संदर्भात मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या आहेत. त्या अनुषंगाने आरोग्य सेवा संचालनालयाच्या अंतर्गत आरोग्य संस्थांसाठी लागणा-या औषधे व साधन सामुग्रीची खरेदी करतांना खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१) विभागीय / जिल्हा स्तरावर खरेदी करण्यासाठी संचालनालयाचे खरेदीचे दर तसेच BMC, DMER, ESIC व DGS&D यांचे दर विचारात घ्यावेत. उपरोक्त संस्थांपैकी ज्या संस्थेचे दर वैध आहेत त्यांना ई-मेल द्वारे पुरवठा करण्यास तयार आहात काय व असल्यास ७ व्या दिवशी संध्याकाळी ५ वाजे पर्यंत लखी होकार देण्यात यावा असे कळविण्यात यावे. सातव्या दिवशी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत होकार आलेल्या पुरवठादारांपैकी न्युनत्तम दर असणा-या पुरवठादारास खरेदी आदेश देण्यात यावेत.

२) वैध दरकरार उपलब्ध असणा-या सर्वच पुरवठाधारकांनी पुरवठा करण्यास नकार दिल्यास किंवा औषधे व साधन सामुग्री उपरोक्त कोणत्याही दरकरारावर उपलब्ध नसल्यास व सदर बाबींची खरेदी स्थानिक खरेदी प्रक्रियेद्वारे करण्यात येईल. ही खरेदी अंदाजीत वार्षिक किंमत रु.५०,०००/- पेक्षा कमी असल्यास त्यांची खरेदी दरपत्रके

Scanned with CamScanner

मागवुन व खरेदीची अंदाजीत वार्षिक किंमत रु.५०,०००/- पेक्षा जास्त उ
जिल्हा स्तरावर निविदा मागवुन खरेदी करण्यात यावी.

३) ज्या औषध व साधन सामुग्रीचे आरोग्य सेवा संचालनालयाचे दरकरार केलेले अशा बाबी फक्त आरोग्य सेवा संचालनालयाच्या दरकरारावरच खरेदी क याव्यात.

४) औषधे, साधन सामुग्री, उपकरणे ई. खरेदी करतांना जिल्हयाची गरज, स्तरावरुन करण्यात येणारा पुरवठयाचा कालावधी ई. बाबी विचारात घ्याव्यात. केलेली औषधे विनावापर राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

वरील प्रमाणे सुचना आपल्या अधिपत्याखालील सर्व आरोग्य संस्थांना सुध्दा निर्गमित क याव्यात.

सहसंचालक आरोग्य सेवा
(खरेदी कक्ष) मुंबई

प्रत सविनय सादर :- १) मा. सचिव (२) सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई - १
२) मा. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई - १

Scanned with CamScanner

# आरोग्य सेवा संचालनालय

(महाराष्ट्र राज्य)

"आरोग्य भवन", सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, मुंबई- ४०० ००१

| | दूरध्वनी | |
|---|---|---|
| संचालक (वैयक्तिक) | 22621006 | Website : arogya maharashtra gov.in |
| सहसंचालक (रुग्णालये-राज्यस्तर) | 22611471 | Email : dhs_2005@rediffmail.com |
| सहसंचालक (प्राआकेंद्र-जिपस्तर) | 22620249 | Email : miscell@rediffmail.com |
| सहसंचालक (असंसर्गजन्य रोग) | 22621047 | Fax No 022-22621034 / 22620234 (DHS) |
| सहसंचालक (खरेदी कक्ष) | 22651026 | 022-22679044(Hosp.) |
| सहसंचालक (अर्थ व आस्थापना) | 22621186 | 022-22622155(CAO) |
| | | 022-22703785(Control Room) |
| | | 022-22621047 (NCD) |
| | | 022-22625799(Procurement Cell) |


क्र.संआसे/खरेदी कक्ष/खरेदी मार्गदर्शन/१६
दिनांक - २१ जानेवारी, २०१६.

प्रति,

१) कार्यक्रम प्रमुख (सर्व)
२) उपसंचालक आरोग्य सेवा, विभागीय मंडळ (सर्व)
३) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
४) जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय (सर्व)

विषय - शासन निर्णय दि.३०.१०.२०१५ अन्वये खरेदी संबंधी मार्गदर्शन करण्याबाबत...

संदर्भ - १) विविध जिल्हयांकडून प्राप्त झालेले पत्र
२) शासन निर्णय क्र.आखस/२०१४/प्रकरण अ-८२/ भाग क्र.III/ऊ ४, दि.३०.१०.२०१५
३) शासन पत्र क्र.खरेदी २०१३/प्रक्र.१९/आरोग्य-८, दिनांक - ११.०२.२०१३

शासनाने राज्याच्या खरेदी धोरणासंदर्भाने दिनांक ३०.१०.२०१५ च्या निर्णयान्वये नवीन खरेदी धोरण प्रसिध्द केले आहे. या धोरणानुसार संचालनालय आरोग्य सेवा यांचेमार्फत प्रसिध्द केलेले दर विचारात घ्यावे किंवा कसे याबाबत जिल्हयांकडून विचारणा होत आहे. त्यास अनुसरुन सर्व जिल्हयांना कळविण्यात येते की, संचालनालयातर्फे प्रसिध्द करण्यात येणारे दर हे दि.३०.१०.२०१५ च्या धोरणातील तरतूदीनुसार ई निविदेद्वारे निश्चित करण्यात आले आहेत. हे दर ठरवितांना जिल्हयाची गरज निविदेमध्ये समाविष्ठ करण्यात आली आहे. तसेच या दरांना केंद्रीय खरेदी समितीची मान्यता घेऊनच दर निश्चित केलेले आहेत.

उपरोक्त वस्तुस्थिती पाहता संचालनालयातर्फे प्रसिध्द केलेल्या दरांनी जिल्हयांनी जिल्हास्तरावर खरेदी करण्यास हरकत नाही.

संचालक आरोग्य सेवा,
मुंबई.

Scanned with CamScanner